# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### परिपत्रक

**महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून मूळ कागदपत्रांची मागणी न करणेबाबत..**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, MAHADBT पोर्टलवर शिष्यवृत्तीच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजनांसाठी विद्यार्थ्यांना अर्ज करताना वेगवेगळी कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा पोर्टलवर उपलब्ध आहे. यासंदर्भात काही महाविद्यालय/संस्थाकडून काही मूळ कागदपत्रांची मागणी करीत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

विद्यार्थ्यांनी अपलोड केलेली कागदपत्रे तपासण्याची प्राथमिक जबाबदारी महाविद्यालय/संस्थेची असून विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या वेळी जमा केलेल्या विविध कागदपत्रांच्या आधारे तपासणी करून अर्जावर कार्यवाही करावी अशा सूचना शासनाने पत्र क्र. उशिसं/शिष्य–२०१८/डीबीटी/६७३ दि. १४/०१/२०१९ अन्वये दिलेल्या आहेत. सोबत पत्राची प्रत जोडत आहे.

तरी, शासनाने दिलेल्या सुचनेनुसार अपवादात्मक परिस्थिती खेरीज कोणत्याही विद्यार्थ्यांकडून महाविद्यालय/संस्था यांनी मूळ कागदपत्रांची मागणी करू नये.

21/1/2019

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/२६१
दिनांक : २१/०१/२०१९

प्रत:

मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये/संस्था.

Ph.D./M.Phil. Unit
Inward No.: 653
Date: 17/01/19

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१


web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी / ६०७३ दि. १४/०१/२०१९

मा. कुलसचिव यांचे कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक /क्र. 332
दिनांक - 15/01/2019
जावक दिनांक - 16/1/19
विभाग - (PG)

**तात्काळ अत्यंत महत्वाचे**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय :- महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून मूळ कागदपत्रांची मागणी न करणेबाबत...**

संदर्भः- शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र. २७८/तांशि-४, दि. ०७.०१.२०१९

उपरोक्त विषयाबाबत शासनाच्या संदर्भिय परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यात सध्या महाडीबीटी पोर्टलमार्फत शिष्यवृत्तीच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. विविध विभागाच्या विविध योजनांसाठी वेगवेगळी कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा महाडीबीटी पोर्टलवर देण्यात आली आहे. महाडीबीटी पोर्टलसंदर्भात दिनांक २९ डिसेंबर, २०१८ रोजी मा. मुख्य सचिव यांनी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये काही विभागाचे अधिकारी विद्यार्थ्यांकडून / संस्थाकडून काही मूळ कागदपत्रांची मागणी करीत असल्याचे निदर्शनास आणण्यात आले आहे.

याबाबत संदर्भिय परिपत्रकाच्या अनुषंगाने सूचीत करण्यात येते की, अपलोड करण्यात आलेली कागदपत्रे तपासण्याची प्राथमिक जबाबदारी संस्थेची असल्याने संस्थानी त्यांचेकडे विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या वेळी जमा केलेल्या विविध कागदपत्रांच्या आधारे ही तपासणी करणे आवश्यक आहे. अतिशय अपवादात्मक परिस्थिती खेरीज कोणत्याही विद्यार्थ्यांकडून संस्थांनी अथवा विभागीय कार्यालयांनी मूळ कागदपत्रांची मागणी करु नये.

सदरची बाब आपल्या विभागातील सर्व संबंधित शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. तसेच त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सोबत :- संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत.

Dy. R. (P.G.)

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, संबंधित सर्व महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी संबंधित विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक यांचे मार्फत.

16/1

Scanned by CamScanner